# प्रस्तावना

प्रस्तुत प्रबंधामध्ये 'पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्रीरूपे' या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासाची दिशा ठरवलेली आहे.

अभ्यासाच्या सोईसाठी इसवी सन १९४७ ते १९८५ हा कालखंड निश्चित केला आहे. इसवी सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारताच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. इंग्रजांच्या आगमनाने भारतातही व्यक्तिवादाचा प्रसार होऊ लागला असला तरी भारतीयांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला प्रत्यक्ष वाव मात्र १५ ऑगस्ट १९४७ नंतर स्वातंत्र्यामुळे मिळाला. यामुळे १९४७ हे साल अभ्यासाच्या प्रारंभासाठी निवडले आहे.

प्रत्यक्ष अभ्यासास सुरुवात केल्यानंतर आत्मचरित्राचे व्यापकत्व लक्षात आले. सर्व आत्मचरित्रांना न्याय देणे शक्य व्हावे म्हणून कालखंडनिश्चिती करणे भाग पडले. यानुसार इसवी सन १९८५ ही मर्यादा घालून घेतली. यामुळेच ज्यांनी स्फुट स्वरूपात स्वतःविषयी लेखन करून नंतर त्याचे पुस्तक केले आहे, अशी आत्मपर पुस्तके किंवा जी संपादने किंवा भाषांतरे आहेत अशा आत्मचरित्रांचाही यात विचार केला नाही. प्रस्तुत अभ्यासात पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्रीरूपे म्हणून विचार केलेल्या रूपांमध्ये आई, बहीण, पत्नी आणि मुलगी या रूपांचा अभ्यास केला आहे. कारण या रूपांशी त्यांचा प्रत्यक्ष रक्तसंबंध, नातेसंबंध असतो. त्यामुळे वास्तव दृष्टिकोन लक्षात येतो. ज्या आत्मचरित्रांमध्ये आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांचा उल्लेख नाही अशी आत्मचरित्रेही यामुळे आपोआप वगळली आहेत.

पुरुषांच्या आत्मचरित्रांचा हा अभ्यास वाङ्मयीन अभ्यास किंवा समाजशास्त्रीय अभ्यास नाही. ताराबाई शिंदे यांनी इसवी सन १८८२ मध्ये आपल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातून स्त्रियांवरील अन्यायाचा परखडपणे समाचार घेऊन पुरुषांचा ढोंगीपणा उघड केला होता. पण त्यानंतर मात्र ही विचारधारा लुप्तप्राय झाली. इसवी सन १९६० नंतर मराठी साहित्यात स्त्रीवादी विचारप्रवाह नव्याने उदयाला आला. तत्पूर्वी तो पाश्चात्य साहित्यात इसवी सन १९४८ ला उदयाला आला. या विचारप्रवाहानुसार पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रियांची सतत मुस्कटदाबी होते. संपूर्ण समाज व्यवस्थेवर पुरुषांचे वर्चस्व असते. याचे प्रतिबिंब साहित्यातही दिसून येते. तरीही बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार स्त्रीचे कुटुंबातील स्थान बदलून स्त्रीच्या कुटुंबाकडून आणि कुटुंबाच्या स्त्रीकडून असलेल्या अपेक्षा, तिचे आर्थिक स्वावलंबन, पुरुषाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन यात वरवर बदल झालेले दिसतात. डॉ. अंजली सोमण यांनी "मराठी कादंबरीतील स्त्री : एक ऐतिहासिक दृष्टिकोन" (संपा. दत्तात्रय पुंडे, <u>वाङ्मयेतिहासाची संकल्पना</u>, प्रतिमा प्रकाशन, सु. आ. १९९४) या लेखात म्हटल्याप्रमाणे मराठी कादंबरीत वरील बदलाची प्रतिबिंबे पडलेली आढळतात असे म्हटले आहे. कथा, कविता, नाटक यासारख्या वाङ्मयप्रकारातही हे बदल आढळणार. तरीही आत्मचरित्रकारांची निवड करावीशी वाटली. कारण या वाङ्मयप्रकारात त्या त्या व्यक्तीची मूल्यसरणी व्यक्त होते.

पुरुषांच्या आत्मचरित्रांचे पुनर्वाचन या तत्त्वानुसार या आत्मचरित्रांची पाहणी केली आहे.

या आत्मचरित्रांची पाहणी करीत असताना दलित आत्मकथनांचा विचार वेगळा केला आहे. कारण दलित आत्मकथनांच्या लेखनामागील प्रेरणा, प्रवृत्ती मुळातच भिन्न असतात. दलित साहित्य हे समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे साहित्य आहे. अर्थातच दलित आत्मकथनाकडूनही हीच अपेक्षा आहे.

*अभ्यासाची आवश्यकता : -*

शतकानुशतके पुरुषप्रधान कुटुंबपद्धतीने स्त्रियांना दुय्यम स्थानावर ठेवले आहे. यासाठी त्यांनी स्त्रियांच्या स्वभावाची, वर्तनाची मिथके तयार केली. त्यात स्त्री ही प्रेमळ, विनयशील, त्यागी, लाजाळू अशा रूपात रंगवली किंवा दुष्ट, चेटकीण अशा रूपात रंगविली आहे. कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके यातून स्त्रियांचे चित्रण साचेबंद रूपातच होत असते. अर्थात या वाङ्मयप्रकारातील स्त्रीचित्रण मोठ्या प्रमाणात काल्पनिक असते. पुरुषांनी आत्मचरित्रात असेच साचेबंद चित्रण केले आहे का याचीही तपासणी करणे आवश्यक वाटले.

कथाकादंबऱ्यांतून होणाऱ्या स्त्रियांच्या साचेबंद नमुन्याच्या निर्मितीमुळे स्वत्त्वाविषयी जागरूक नसणाऱ्या स्त्रिया अशा नमुन्याशी तादात्म्य पावतात, एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. अशा रूपांना आपल्यासमोर आदर्श ठेवून स्वतःचे स्वत्त्व आणि व्यक्तित्त्व घडवण्याची जबाबदारी अशा नमुन्यांवर सोपवतात. कोणतीही विचारप्रणाली आपल्या विचाराच्या प्रसाराकरिता अशा सर्वसामान्य व्यक्तीची ही प्रवृत्ती लक्षात घेऊन आपल्या विचारांचा प्रचार करते.

शिक्षक, उद्योजक, पत्रकार, कलावंत, स्वातंत्र्यासाठी लढा देणारे यांना समाजात मानाचे स्थान असते. समाज त्यांच्याकडे आदर्श व्यक्ती म्हणून पाहतो. समाजात नवीन विचारांची पेरणी, समाजसुधारणा यांचे नेतृत्त्व ते करत असतात. ते आत्मचरित्रात आपल्या घरातील स्त्रियांकडे कोणत्या भूमिकेतून पाहतात, त्यांना कोणत्या रूपात कल्पितात हे तपासणे आवश्यक वाटले. कारण कल्पनारम्यता, रंजनात्मकता असणाऱ्या वाङ्मयप्रकारातील साचेबंद नमुन्याशींही तादात्म्य पाहणाऱ्या स्त्रिया अशा आदर्श व्यक्तींच्या प्रत्यक्ष जीवनातील स्त्रियांशी तादात्म्य पावणारच. म्हणूनच जीवनाच्या जास्तीत जास्त जवळ जाणाऱ्या आत्मचरित्रांचे पुनर्वाचन करणे आवश्यक वाटले.

अशा प्रकारच्या पुनर्वाचनाची संकल्पना स्त्रीवाद्यांनी मांडली असली तरी त्यादृष्टीने मराठीमध्ये फारसे वाचन झालेले नाही. स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याची स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासपूर्ण समीक्षा मराठीत झाली आहे. त्यात डॉ. स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. विलास खोले, डॉ. प्रभा गणोरकर, डॉ. मंगला वरखेडे, डॉ. सरोजिनी वैद्य, डॉ. अश्विनी धोंगडे, डॉ. केशव सद्रे वगैरेंनी मोलाची भर घातली आहे. माया पंडित यांनी गंगाधर गाडगीळ यांच्या कथांचे

अशा रीतीने वाचन केले आहे. तर शांता गोखले यांनी साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' चे वाचन केले आहे. (मूळ लेख - इंग्रजी) 'पुनर्वाचन' या दृष्टीने केलेल्या समीक्षेचे स्त्रीवादी समीक्षेतील महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन प्रस्तुत प्रबंधात स्त्रीवाद, त्याचा इतिहास यावर भर न देता पुनर्वाचन या संकल्पनेवर लक्षकेंद्रित केले आहे.

यातील अनेक आत्मचरित्रे विविध अंगांनी संपन्न आहेत. त्यांना वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्व आहे. अनेक व्यक्तींनी विविध अडचणीतून आपले अनुभव घडवण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले आहे. विविध प्रकारची कष्टांची कामे केली आहेत. जिद्दीने आपले ध्येय गाठले आहे. विशिष्ट ध्येयाने भारून जाऊन आपले जीवन समर्पित केले आहे. असे आदर्श नव्या पिढीसमोर येणे आवश्यकच असते. त्यातूनच एखाद्याच्या व्यक्तित्त्वात स्फूर्तीची ठिणगी पडून त्याच्या आयुष्याला नवे वळण मिळते. प्रस्तुत प्रबंधात घेतलेल्या आत्मचरित्रांचे महत्त्व, आत्मचरित्रकारांचे दैदिप्यमान कर्तृत्व प्रबंध लेखिकेला मान्य आहेच. परंतु स्वत:चा विकास करत असताना आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असणाऱ्या घरातील स्त्रियांचा विकास करण्याकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष होते. याचे प्रमुख कारण पुरुषप्रधान समाजव्यवस्था हेच आहे. याकडे लक्ष वेधणे आवश्यक होते. त्यादृष्टीनेही हा प्रयत्न महत्त्वाचा ठरावा अशी अपेक्षा आहे.

पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्रीरूपे पाहताना स्त्रीवादी दृष्टिकोनातून या रूपाची पाहणी केल्यामुळे त्याला एक चौकट मिळते. तो अभ्यास बंदिस्त आणि मर्यादित होतो अशी एक मर्यादा या अभ्यासास असल्याचे मान्य करूनही आंतरविद्याशाखीय अभ्यास करणे आवश्यक होते. त्यामुळेच हा प्रयत्न केला आहे. यामुळे शैलीवैज्ञानिक समीक्षा, रूपवादी समीक्षा, सांस्कृतिक दृष्टिकोन वगैरे दृष्टिकोन बाजूला ठेवले असले तरी पुरुषांच्या संहितांचे पुनर्वाचन या दृष्टिकोनातून हा अभ्यास खोलवर करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रबंधात वर्णनात्मकता येण्याचा दोष पत्करूनही आवश्यक तेथे आत्मचरित्रातील उतारे दिले आहेत. घरातील स्त्रियांविषयी बोलताना त्यांच्या कष्टाचे, त्यागाचे, उदात्तीकरण करताना आत्मचरित्रकार कोणते शब्द वापरतात हे लक्षात येण्यासाठी हे आवश्यकच होते.

स्त्रीवादाने सैद्धांतिक चौकट नाकारलेली आहे. त्यामुळे अशा पुनर्वाचनाची नेमकी चौकट असणे शक्य नाही. त्यामुळे आत्मचरित्रकार घरातील स्त्रियांसंदर्भात कोणत्या बाबींचा उल्लेख करतात त्याचा परामर्श घेऊन जेथे पुरुषप्रधानता जाणवते त्या अंशाचे पुनर्वाचन केले आहे. प्रस्तुत अभ्यास स्त्रीवादी दृष्टिकोनामधून केलेल्या साहित्याभ्यासामध्ये महत्त्वाचा ठरेल अशी आशा वाटते.